## उल्हासनगर महानगरपालिका,उल्हासनगर
### माहिती व जनसंपर्क विभाग

दिनांक : १४ एप्रिल, २०२१

# प्रेसनोट (प्रसिध्दी )

## : आदेश :

विषय :- कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण आणणेसाठी उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये दि.३०/०४/२०२१ पर्यंत प्रतिबंधक मार्गदर्शक सूचना (Break the Chain-01)

संदर्भ :- १) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, १८९७
२) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५
३) महाराष्ट्र शासन, अधिसुचना, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई, दि. १३ मार्च,२०२०
४) महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुर्नवसन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील आदेश क्र. DMU/२०२०/C.R.९२/DisM-१, दि. ३१ मे,२०२०, ४ जून,२०२०, दि. २९ जून,२०२०, दि. २९ जुलै,२०२०, दि. ३१ ऑगस्ट, २०२०, दि. ३० सप्टेंबर, २०२०, दि. १४ ऑक्टोंबर, २०२०, दि. २३ ऑक्टोंबर, २०२०, दि. २९ ऑक्टोंबर, २०२०, दि. ३ नोव्हेंबर, २०२०, दि. १४ नोव्हेंबर, २०२०, दि. २३ नोव्हेंबर, २०२०, दि. २७ नोव्हेंबर, २०२०, दि. २१ डिसेंबर, २०२०, दि. २४ डिसेंबर, २०२०, दि. २९ डिसेंबर,२०२०, दि. २४ फेब्रुवारी, २०२१, दि. १५ मार्च, २०२१, दि. २७ मार्च, २०२१, दिनांक ४ एप्रिल, २०२१ व दिनांक ५ एप्रिल, २०२१
५) आदेश क्र. उमपा/वै.आ.वि/२२१/२०, दिनांक ०२ जुन, २०२०
६) आदेश क्र.उमपा/वै.आ.वि/७५५/२०२०, दिनांक १ जुलै,२०२०, २ जुलै,२०२०
७) आदेश क्र.उमपा/वै.आ.वि/८००/२०२०, दिनांक ११ जुलै,२०२०
८) आदेश क्र.उमपा/वै.आ.वि/९२८/२०२०, दिनांक २२ जुलै,२०२०
९) आदेश क्र.उमपा/वै.आ.वि/१००७/२०२०,दिनांक ३१ जुलै,२०२०
१०) आदेश क्र.उमपा/वै.आ.वि/१०९८/२०२०,दि. १७ ऑगस्ट,२०२०
११) आदेश क्र.उमपा/वै.आ.वि./१२०१/२०२० दिनांक १ सप्टेंबर, २०२०
१२) आदेश क्र.उमपा/वै.आ.वि./१२०१/२०२० दिनांक १ ऑक्टोंबर, २०२०
१३) आदेश क्र.उमपा/वै.आ.वि./१४२६/२०२० दिनांक १५ ऑक्टोंबर, २०२०
१४) आदेश क्र.उमपा/वै.आ.वि./१९३४/२०२० दिनांक ३१ डिसेंबर, २०२०
१५) आदेश क्र.उमपा/आ.का./१८१/२०२१ दिनांक २२ फेब्रुवारी, २०२१
१६) आदेश क्र.उमपा/आ.का./२०३/२०२१ दिनांक १७ मार्च, २०२१
१७) आदेश क्र.उमपा/आ.का./२२०/२०२१ दिनांक २८ मार्च, २०२१
१८) आदेश क्र.उमपा/आ.का./२२३/२०२१ दिनांक ५ एप्रिल, २०२१
१९) आदेश क्र.उमपा/आ.का./२२४/२०२१ दिनांक ८ एप्रिल, २०२१
२०) महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुर्नवसन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील आदेश क्र. DMU-२०२०/C.R.९२/DisM-१,दि.१/४/२०२१

ज्या अर्थी, सध्या जगभरात पसरलेल्या कोरोना विषाणूची लागण राज्यातील काही भागात झाली आहे. सदर रोगाचा प्रसार टाळण्यासाठी शासनाने राज्यभर अनेक प्रतिबंधात्मक उपायोजना लागू केल्या आहेत. त्यादृष्टीने राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (COVID-१९) प्रार्दुभाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा. १८९७ दिनांक १३ मार्च, २०२० पासून लागू करुन खंड २, ३ व ४ मधील तरतूदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे.

ज्या अर्थी, वरील अधिनियम व नियमानुसार साथरोग अधिनियमाच्या खंड २(१) नुसार महानगरपालिका आयुक्त हे सक्षम प्राधिकारी घोषित करून त्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात कोव्हिड १९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी ते सक्षम असतील असे घोषित करण्यात आले आहे.

आणि ज्या अर्थी, महाराष्ट्रात काही ठिकाणी पुनश्च: कोरोना रुग्णांच्या संख्येत गेल्या काही दिवसांत वाढ झाल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे यावर शहरात वेळीच प्रतिबंधात्मक कार्यवाहीच्या दृष्टीने काही निर्बंध करणे आवश्यक असून, यापूर्वी वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सूचना व नियमांचे पालन करणे बंधनकारक राहिल.

ज्याअर्थी, संदर्भ क्र. २० मधील दिनांक दिनांक १३ एप्रिल, २०२१ च्या आदेशान्वये कोव्हीड १९ चा प्रसार व प्रतिबंधक उपाययोजनेच्या अनुषंगाने दि. ३० एप्रिल, २०२१ पर्यंत निर्बंध लादणेबाबत शासनाचे आदेश प्राप्त झाले आहेत.

त्याअर्थी, साथरोग प्रतिबंधक अधिनियम १८९७ च्या कलम २ अन्वये, तसेच आपत्ती व्यवस्थापन अधिनियम. २००५ च्या सर्व संबंधित तरतुदींसह प्राप्त अधिकारांचा वापर करुन वरील संदर्भ क्र. २० अन्वये आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर हे शासनाने जाहीर केल्याप्रमाणे दिनांक १४ एप्रिल, २०२१ रोजी रात्री ०८.०० वाजेपासून दिनांक १ मे, २०२१ रोजी सकाळी ०७.०० वाजेपर्यंत खालील निर्बंध लागू करित आहेत.

**कोविड-१९ संदर्भात मार्गदर्शक सूचना**

**१. कलम १४४ व रात्र संचार बंदी (Imposition of Section 144 and Night Curfew) :**

१.१) उपरोक्त संदर्भिय आदेश क्र. २० अन्वये संपूर्ण राज्यामध्ये कलम १४४ लागू करण्यात आलेले आहे त्याअनुषंगाने उल्हासनगर शहरात देखील कलम १४४ लागू राहील.

१.२) उल्हासनगर शहरात कोणत्याही व्यक्तीस खालील वैध कारणाशिवाय सार्वजनिक ठिकाणी संचार करता येणार नाही.

१.३) सर्व आस्थापना, सार्वजनिक ठिकाणे, उपक्रम, सेवा बंद राहतीत.

१.४) जीवनावश्यक सेवेत मोडत असलेल्या सर्व सेवा व व्यवहार हे यातून वगळण्यात येत आहे.

१.५) अपवाद श्रेणीत मोडत असलेल्या सेवा आणि व्यवहार सोमवार ते शुक्रवार सकाळी ०७.०० ते रात्री ०८.०० वाजेपर्यंत वगळण्यात येत आहे. .

**२. अत्यावश्यक सेवांमध्ये खालील बाबींचा समावेश असेल.**

i. रुग्णालये, चाचणी केंद्रे, दवाखाने, लसीकरण, वैद्यकीय विमा कार्यालये, फार्मसी, औषधांच्या कंपन्या व इतर वैद्यकीय व आरोग्य सेवांचे सहाय्य उत्पादक व वितरक तसेच विक्रेते मालवाहतूक व वितरण व्यवस्था, लसीकरण उत्पादन व वितरण, सॅनिटायझर, मास्क्, वैद्यकीय उपकरणे त्यांची उपकरणे, कच्चा माल व त्यांच्या सहाय्य सेवा

ii. पशुवैद्यकीय सेवा/प्राण्यांचे निवारा केंद्र व पाळीव पाण्यांचे फुड शॉप

iii. किराणा दुकाने, भाजीपाल्याची दुकाने, फळ विक्रेते, डेअरी, बेकरी, कन्फेक्शनरी, सर्व प्रकारचे फुड शॉप

iv. शीतगृहे व वेअर हॉउसिंग सर्व्हीसेस

v. सार्वजनिक परिवहन : ट्रेन, टॅक्सी, ऑटोरिक्षा आणि सार्वजनिक बस सेवा

vi. विविध राजनैतिक अधिका-यांच्या कार्यालयीन आणि अनुषंगिक सेवा.

vii. महानगरपालिकेमार्फत करण्यात येणारी मान्सूनपुर्व कामे व सार्वजनिक कामे.

viii. रिझर्व्ह बँक आणि त्यांनी आवश्यक ठरवलेली सर्व कामे.

ix. मालवाहतूक

x. कृषिविषयक सेवा

xi. SEBI व SEBI शी संबंधित कार्यालये उदा. स्टॉक एक्सचेंज व SEBI कडे नोंदणीकृत असलेल्या संबंधित कंपन्या.

xii. दुरसंचार सेवांशी संबंधित सेवा, देखभाल दुरुस्ती.

xiii. वस्तू वाहतूक

xiv. शेतीशी संबंधित सर्व कामे आणि शेती निरंतरपणे होवू शकेल यासाठीची सर्व कामे, यात बी-बियाणे, खते, उपकरणे आणि दुरुस्ती हे सर्व समाविष्ट आहे.

xv. आयात निर्यात विषयक सर्व व्यवहार.

xvi. ई-कॉमर्स (फक्त जीवनावश्यक वस्तूविषयक)

xvii. अधिस्विकृतीधारक प्रसार माध्यमे (Accredited Media)

xviii. पेट्रोल पंप व पेट्रोलियम पदार्थांशी निगडीत इतर उत्पादने

xix. सर्व कार्गो (Cargo) सर्व्हीसेस

xx. डेटा सेंटर/क्लाऊड सर्व्हीस प्रोव्हायडर, आय.टी क्षेत्राशी निगडीत महत्त्वाच्या पायाभुत सेवा/सुविधा

xxi. शासकीय व खाजगी सुरक्षा सेवा

xxii. विद्युत व गॅस वितरण सेवा

xxiii. ए.टी.एम. आणि तत्ससंबंधीच्या सेवा.

xxiv. टपाल सेवा

xxv. लस तसेच इतर जीवरक्षक औषधे आणि औषणी उत्पादकांचे कस्टम हाऊस एजंट तसेच परवानधारक मल्टिमोडल वाहतूकदार.

xxvi. कोणत्याही जीवनावश्यक वस्तूंचे कच्चे माल किंवा वेष्ट्नसामुग्री बनवनारे कारखाने.

xxvii. आगामी पावसाळयासाठी वैयक्तिक वा संस्थात्मक उत्पादनांमध्ये कार्यरत दवाखाने.

xxviii. लॉन्ड्री सेवा दुकाने व विद्युत उपकरणे दुरुस्ती सेवा.

xxix. महापालिकेव्दारे निर्धारित करण्यात येणा-या इतर सेवा

**२. वरील सेवांच्या प्राधिकरणांना खालील नियमांचे पालन करणे बंधनक कारक असेल.**

२.१) सर्व सहायक आयुक्त (प्रभाग समिती) कार्यालयांनी हे सर्व निर्बंध नागरिकांच्या संचारावर असून, वस्तू व मालावर नसतील याची नोंद घ्यावी.

२.२) यात नमुद केलेल्या सेवांच्या कार्यान्वयनासाठी आवश्यक वाहतूक हे वैध कारण राहील, याची नोंद घ्यावी.

२.३) या सेवांची विशिष्ट् वेळी वा कारणाने गरज भासली तर संबंधित व्यक्ती वा उल्हासनगर महानगरपालिकेसाठी ती सेवा जीवनावश्यक गणली जावी.

**३. अत्यावश्यक सेवांमध्ये येणा-या आस्थापनांना खालील नियमांचे पालन करणे बंधनकारक असेल.**

३.१) अत्यावश्यक सेवांची दुकाने सुरु ठेवतांना ग्राहकांमध्ये भौतिक अंतराचे पालन होईल याची दक्षता घेण्यात यावी. ग्राहकांची गर्दी जास्त झाल्यास दुकानाबाहेर भौतिक अंतरासाठी मार्कींग करुन त्या ठिकाणी ग्राहक उभे राहतील याची दक्षता घ्यावी.

३.२) शासनाने निश्चित केलेल्या नियमावलीनुसार अत्यावश्यक सेवेतील दुकानमालक व दुकानातील कर्मचारी यांनी लवकरात लवकर कोव्हीड लसीकरण करुन घ्यावे दुकान सुरु ठेवतांना ग्राहकांशी थेट संपर्क येवू नये म्हणून आवश्यक उपाययोजना कराव्यात उदा. पारदर्शक काच, मटेरियल शिल्ड व इलेक्ट्रॉनिक पेमेंट, इ. यांचा अवलंब करावा.

३.२) नियमांचे उल्लंघन करणा-या व्यक्तीस रु ५००/- एवढा व संबंधित आस्थापनांकडून रु १,०००/- एवढा दंड वसुल करण्यात येईल. वारंवार नियमांचे उल्लघन केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित आस्थापना कोव्हीड आपत्ती संपुष्टात येईपर्यंत बंद करण्यात येईल.

३.३) जीवनावश्यक वस्तू, दुकानातले व्यवहार करण्यासाठी कर्तव्यपूर्तीसाठी कामगारांची वाहतूक हे वैध कारण धरले जाईल.

३.४) दुकान, भाजीपाला दुकान, फळविक्रेते, दुधदुकाने, बेक-या, खाद्यपदार्थ दुकाने या संदर्भात दाट लोकवस्तीच्या ठिकाणी दुकाने आहेत का किंवा दुकानांमध्ये गर्दी होते आहे का, याबाबत सर्व सहायक आयुक्त, प्रभाग समिती यांनी वेळोवेळी पाहणी करुन दुकानांच्या वेळा बदलणे तसेच दुकानांच्या वेळा निर्धारित करुन देणे आवश्यक आहे. खुल्या मैदानांच्या जागा, मोकळया जागा निर्धारित करुन काही

दुकाने हलवणे शक्य आहे का, तात्पुरत्या स्वरुपाची दुकानं सुरु करता येतील का, हे बघणेही आवश्यक आहे. सर्व सहायक आयुक्त, प्रभाग समिती यांनी सर्व प्रकारच्या उपाययोजना करुन, जी जीवनावश्यक वस्तुंची दुकाने कोव्हीड पसरण्यास कारणीभुत ठरतील ती बंद करु शकतात.

३.५) जी दुकाने सद्यस्थितीत बंद राहणार आहेत, त्या सर्व दुकानमालकांनी त्यांचेकडे काम करणा-या सर्व व्यक्तींचे शासनाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे लसीकरण करुन घ्यावे, ग्राहकांशी थेट संपर्क येवू नये म्हणून पारदर्शक काच, मटेरियल शिल्ड व इलेक्ट्रॉनिक पेमेंट, इ. संबंधितांची सुसज्ज करुन ठेवावे, जेणेकरुन दुकाने लवकरात लवकर सुरु करण्याचा निर्णय घेता येईल.

## ४. सार्वजनिक वाहतूक सेवा (Public Transport) :

सार्वजनिक वाहतूक सेवा खालील निर्बंधासह सुरु ठेवण्यास मुभा असेल.

४.१) **ऑटोरिक्षा :** वाहनचालक व फक्त दोन प्रवासी अनुज्ञेय असतील.

४.२) **टॅक्सी (चार चाकी) :** वाहन चालक व आरटीओ ने निर्धारित केलेल्या क्षमतेच्या फक्त ५० % प्रवासी अनुज्ञेय असतील.

४.३) **बससेवा :** आरटीओ ने निर्धारित केलेल्या क्षमतेएवढी प्रवासी वाहतूक अनुज्ञेय असेल तथापि उभ्याने प्रवास करण्यास मनाई असेल. सर्व प्रवाश्यांना मास्क घालणे बंधनकारक आहे.

अ. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर करणा-या सर्व नागरिकांना मास्कचा वापर करणे बंधनकारक असेल. अन्यथा रु ५००/- दंड वसुल केला जाईल.

आ. चार चाकी टॅक्सी मध्ये जो प्रवासी मास्क घालणार नाही त्याच्याकडून व टॅक्सी चालकाकडून प्रत्येकी रु ५००/- दंड वसुल केला जाईल.

इ. प्रत्येक फेरी नंतर वाहन निर्जतुंकीकरण करणे बंधनकारक असेल.

ई. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेतील सर्व वाहनचालक व प्रवाशांशी थेट संपर्क येणा-या कर्मचा-यांनी शासनाच्या नियमावलीनुसार तात्काळ कोव्हीड लसीकरण करुन घ्यावे. कोव्हीड मार्गदर्शक सूचनांचा माहिती फलक प्रदर्शित करावा. टॅक्सी व रिक्षा चालकांनी प्रवाशांच्या व त्यांचेमध्ये प्लॅस्टिक शिटचे आच्छादन लावून प्रवाशांशी त्यांचा थेट संपर्क होणार नाही याची दक्षता घेतल्यास त्यांना या नियमातून सूट असेल.

उ. या संबंधी काम करणा-या व्यक्तींना संचार करणेकरिता वरील १.२ प्रमाणे सुट असेल.

ऊ. बाहेर गांवी जाणा-या ट्रेनमध्ये प्रवासी उभ्याने प्रवास करणार नाहीत व मास्क शिवाय प्रवास करणार नाहीत याची रेल्वे प्रशासनाने दक्षता घ्यावी.

ऋ. ट्रेनमध्ये मास्क शिवाय प्रवास केल्यास रु ५००/- एवढा दंड आकारण्यात येईल.

ऌ. ट्रेन/बस/विमान याने प्रवास करणा-या नागरिकांकडे वैध तिकीट असल्याने ते विमानतळ/बस डेपो/रेल्वे स्टेशन पासून घर तसेच घरापासून विमानतळ/बस डेपो/रेल्वे स्टेशन असा प्रवास त्यांना सार्वजनिक वाहतूक सेवेतून अनुज्ञेय असेल.

## ५. अपावादात्मक सेवा (Exemption Category) :

अ) कार्यालये :

खाली नमुद केलेल्या कार्यालयांना सुट अले. .

i. सहकारी, सरकारी आणि खाजगी बँका
ii. अत्यावश्यक सेवा पुरविणा-या कंपन्यांची कार्यालये
iii. विमा, आरोग्य विमा कंपन्या
iv. औषध निर्मिती व वितरणाशी संबंधित कंपन्याची कार्यालये

v. RBI नियमक घटक व CCIL, NPCI, Payment System Operators, Financial Market Participant
vi. All Non-banking Financial Corporations
vii. All Micro Finance Institutions
viii. वकीलांची कार्यालये

५.१) वरील नमुद कार्यालयांनी कमीत कमी कर्मचा-यांसह काम करावे आणि एका वेळेला कार्यालयात क्षमतेच्या ५० % टक्यापेक्षा जास्त कर्मचारी कोणत्याही स्थितीत हजर राहता कामा नये. कोव्हीड १९ मध्ये प्रतिबंधित कार्यवाही करण्याशी संबंधित विभाग व अत्यावश्यक सेवा यास अपवाद असतील.

५.२) सदर कार्यालयांमध्ये हजर राहण्यासाठी येण्या जाण्यासाठी परवानगी गृहीत धरण्यात येईल.

५.३) सर्व शासकीय कार्यालयांमध्ये उपस्थित असलेला कर्मचारी वर्ग वगळून इतर होणा-या बैठका ऑनलाईन घेतल्या जाव्यात.

५.४) शासकीय कार्यालयांमध्ये अभ्यागतांना प्रवेशास मनाई असेल. E-Visitors System कार्यान्वित करावी.

५.५) सर्व शासकीय आणि खाजगी कार्यालयातील कर्मचा-यांनी शासनाच्या नियमावलीप्रमाणे त्यांचे लसीकरण लवकरात लवकर करुन घ्यावे.

**ब) खाजगी वाहतूक सेवा (Private Transport) :**

१. खाजगी वाहतूक सेवा खाजगी बसेससह आपतकालीन सेवा, अत्यावश्यक सेवा वा या आदेशात नमुद वैध कारणासाठी अनुज्ञेय असेल.

२. याचे उल्लंघन केल्यास संबंधितास रु १,०००/- एवढा दंड आकारण्यात येईल.

३. खाजगी बसेसना खालील अतिरिक्त निर्बंध लागू असतील.

   i. उभ्याने प्रवासी अनुज्ञेय असणार नाहीत.

   ii. वाहतूक व्यवस्थेतील सर्व वाहनचालक व प्रवाशांशी थेट संपर्क येणा-या कर्मचा-यांनी शासनाच्या नियमावलीनुसार तात्काळ कोव्हीड लसीकरण करुन घ्यावे. व बस मध्ये कोव्हीड मार्गदर्शक सूचनांचा फलक प्रदर्शित करावा.

**क) रेस्टॉरेंट, बार, हॉटेल (Restaurants, Bars, Hotels) :**

अ) ज्या हॉटेलमध्ये राहण्याची व्यवस्था आहे व बार आणि रेस्टॉरेंट त्याचा अविभाज्य भाग ते सोडून इतर सर्व रेस्टॉरेंट, बार हे In house dining साठी बंद राहतील. तथापी पार्सल, टेक अवे आणि घरपोच सेवेसाठी पुढील अटी लागू राहतील.

आ) फक्त होम डिलीव्हरी अनुज्ञेय असेल. बार, रेस्टॉरेंट येथून कोणत्याही ग्राहकास पार्सल सुविधा, पिक अप देता येणार नाही.

इ) निवासी हॉटेलच्या आतमधील रेस्टॉरेंट व बार सुरु ठेवता येतील तथापी त्याची सुविधा फक्त तेथे वास्तव्य करुन असणा-या ग्राहकांना (In-mates/Guests) देता येईल. कोणत्याही परिस्थितीत बाहेरील ग्राहकांना सदर सुविधेचा लाभ देता येणार नाही. बाहेरील ग्राहकांसाठी त्यांना वरीलप्रमाणे निर्बंध लागू राहतील.

ई) होम डिलीव्हरीची सुविधा देणा-या व्यक्तींना शासनाच्या प्रचलित नियमाप्रमाणे लसीकरण करणे बंधनकारक असेल.

उ) ज्या इमारतींमध्ये एका पेक्षा जास्त कुटुंब राहत असतील तिथे होम डिलीव्हरी करण्यासाठी सर्व निर्बंधाचे पालन करावे लागतील, अशा इमारतीत होम डिलीवरी करणा-या व्यक्तीस संचार करण्यास मनाई असेल, त्या इमारतीचे कर्मचा-यांनी होम डिलीव्हरी करावी. तसेच होम डिलीव्हरी करणा-या व्यक्ती व इमारतधारकांना कोव्हीड मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे बंधनकारक असेल.

ऊ) कोव्हीड मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन केल्यास संबंधित व्यक्तीस रु १,०००/- एवढा व संबंधित आस्थापनांकडून रु १०,०००/- एवढा दंड वसुल करण्यात येईल. वारंवार नियमांचे उल्लघन केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित आस्थापनांचा परवाना रद्द करुन जोपर्यंत कोव्हीड आपत्ती संपुष्टात येईपर्यंत आस्थापना बंद करण्यात येईल.

ऋ) रेस्टॉरेंट व बार या ठिकाणी काम करणा-या सर्व व्यक्तींनी शासनाच्या प्रचलित नियमानुसार लवकरात लवकर लसीकरण करुन घ्यावे. जेणेकरुन येणा-या कालावधीमध्ये सदर आस्थापना लवकरात लवकर उघडणे शक्य होईल.

**ड) उत्पादन क्षेत्र (Manufacturing Sector) :**

अ) खालील उत्पादन युनिटस शक्यतो शिफटस मध्ये चालू ठेवता येईल.

i. अत्यावश्यक सेवांसंबंधी उत्पादकांना त्यांचे युनिटस पुर्ण क्षमतेने सुरु ठेवता येतील.

ii. निर्यात करण्यासाठीचे सामान बनविणारे कारखाने ज्यांना माल बाहेर पाठवायचा आहे.

iii. ज्या कारखान्यांमध्ये एकदम काम थांबवता येणार नाही आणि जास्त वेळ लावल्यांशिवाय उत्पादन पुन्हा सुरु होऊ शकणार नाही अशा सर्व कारखान्यांना ५० टक्के क्षमतेसह काम करता येईल शासनाच्या उद्योग विभागाने यावर नजर ठेवावी व सर्व नियम काटकोरपणे पाळले जात आहे याची खात्री करावी. अत्यावश्यक सेवेसाठी लागणा-या उत्पादना व्यतीरिक्त ऑक्सीजनचा वापर कोणत्याही उत्पादन क्षेत्रास करता येणार नाही.

iv. कामगारांना राहण्याची व्यवस्था असणारे सर्व उद्योग किंवा युनिट मध्ये कामगार त्याच परिसरातील किंवा इतर ठिकाणच्या कारखान्यात काम करत असतील आणि तेथून वाहतूक सोयीस्क्र आणि सुरक्षित असेल तर ये-जा करता येईल. त्याचप्रमाणे व्यवस्थापन मधील १० % कर्मचारी अधिका-यांना बाहेरून येऊन काम करता येईल. ज्या कर्मचा-यांना बाहेर जाण्याची गरज नाही असे कारखाने वेगवेगळया शिफट्मध्ये काम करु शकतात.

v. व्यवस्थापन, कर्मचारी, प्रशासनामधील सर्व कर्मचारी व अधिका-यांनी शासनाच्या प्रचलित सुचनांनुसार लवकरात लवकर लसीकरण करुन घ्यावे. जर कारखाना भारत सरकारच्या अटीमध्ये बसत असतील तर कार्यस्थळ ठिकाणी लसीकरणाची व्यवस्था करावी.

ब) कंपन्या व उत्पादक कंपन्या यांना खालील बंधने व मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे बंधनकारक राहील.

i. फॅक्टरी व उत्पादन कंपन्यांमध्ये येणा-या सर्व मजुरांचे थर्मल स्कॅनिंग करण्यात यावे.

ii. जर एखादा मजूर/कामगार कोरोना संक्रमित झाल्याचे आढळून आल्यास त्याच्या संपर्कात आलेल्या इतर मजूर/कामगारांना विलगीकरणात त्यांचा पगार देवून ठेवण्यात यावे.

iii. ५०० कामगारांपेक्षा जास्त क्षमता असणा-या कंपन्यांनी त्यांच्या कर्मचा-यांसाठी स्वतंत्र विलगीकरण व्यवस्था करावी. जर विलगीकरण व्यवस्था कंपनी कॅम्पसच्या बाहेर केल्यास संक्रमित कामगारास ने-आण करतांना बाहेरील व्यक्तीच्या संपर्कात येणार नाही याची जबाबदारी कंपनी व्यवस्थापनाची राहिल.

iv. एखादा कामगार कोरोना संक्रमित झाल्याचे आढळून आल्यास जोपर्यंत निर्जतुंकीकरण होत नाही तोपर्यंत कंपनी बंद ठेवण्यात यावी.

v. कंपनीमध्ये जेवणाचे सुट्टीत व चहापानासाठी गर्दी होवू नये यादृष्टीने वेळेचे नियोजन (Staggering/Slots) करावे.

vi. कंपनीतील शौचालयांचे सातत्याने निर्जतुंकीकरण करावे.

क) जर एखादा कामगार कोरोना संक्रमित झाल्यास त्याला वैद्यकीय रजा मंजूर करावी. त्याला कामावरुन काढता येणार नाही. तसेच त्याला या कालावधीचे पुर्ण वेतन अनुज्ञेय राहील.

ड) या ठिकाणी नमुद केलेले नाही असे सर्व उद्योग/कारखाने हे आदेशामध्ये उल्लेखित कालावधीपर्यंत बंद ठेवावा.

**इ) पदपथावरील खाद्य विक्रेते (Roadside Eatable Vendors) :**

अ) आठवडयातील सर्व दिवशी रस्त्याच्या कडेला उभ्या राहणा-या खाद्यपदार्थांच्या गाडयांवर खाद्यपदार्थ घेवून खाता येणार नाहीत. तथापी सकाळी ०७.०० ते रात्री ०८.०० या कालावधीत पार्सल अथवा घरपोच सेवा देता येईल.

आ)पार्सल घेणारे ग्राहक कॉउंटर पासून पुरेसे भौतिक अंतर राखतील याची दक्षता घेण्यात यावी.

इ) या संबंधी सर्व व्यक्तींना शासनाच्या प्रचलित नियमाप्रमाणे लसीकरण करणे बंधनकारक असेल.

ई) जे विक्रेते व ग्राहक कोव्हीड मार्गदर्शक सूचनांबाबत बेजबाबदार वर्तणुक करत असतील त्यांचेकडून रु ५००/- एवढा दंड वसूल करणेत येईल.

उ) वारंवार दंड करुन देखील विक्रेत्याचे वर्तणुकीत सुधारणा होत नसेल तर आपत्ती संपुष्टात येईपर्यंत विक्रेत्याला खाद्यपदार्थ विक्रीस मनाई करण्यात येईल.

**ई) वर्तमानपत्रे/मॅगझिन्स/नियतकालिक (Newspapers/Magzines) :**

अ) वर्तमानपत्र/मॅगझिन्स/नियतकालिकांची छपाई व वितरण अनुज्ञेय असेल.
आ) सर्व दिवशी होम डिलीव्हरी अनुज्ञेय असेल.
इ) या संबंधी सर्व व्यक्तींना शासनाच्या प्रचलित नियमाप्रमाणे लसीकरण करणे बंधनकारक असेल.

**६. करमणूक, मनोरंजन, दुकाने, मॉल्स व शॉपिंग सेंटर इ. (Recreation, Entertainment,shops, malls, shopping centres etc) :**

अ) सिनेमा हॉल पूर्णपणे बंद राहतील.
आ) नाटयगृहे व सभागृहे (Auditorium) बंद राहतील.
इ) मनोरंजनाची ठिकाणे (Amusement Park), व्हीडीओ गेम पार्लर इत्यादी बंद राहतील.
ई) वॉटर पार्क बंद राहतील.
उ) क्लबस, तरण तलाव, व्यायामशाळा आणि स्पोटर्स कॉम्पलेक्स बंद राहतील.
ऊ) सदरहू आस्थापनांशी संबंधित सर्व व्यक्तींनी प्रचलित नियमानुसार लसीकरण करुन घ्यावे, जेणेकरुन सदर आस्थापना लवकरात लवकर उघडता येतील.
ऋ) चित्रपट, मालिका आणि जाहिराती यांचे चित्रीकरण बंद राहतील.
ऌ) अत्यावश्यक सेवा वगळता इतर सर्व दुकाने, मॉल्स, शॉपिंग सेंटर बंद राहतील.
ऍ) सर्व उद्याने, मैदाने व सार्वजनिक जागा इ. बंद राहतील.

**७. धार्मिक ठिकाणे (Religious Places of Worship) :**

अ) सर्व धार्मिक स्थळे बंद राहतील.
आ) धार्मिक स्थळांच्या ठिकाणी पूजा अर्चा करणा-या व्यक्ती त्यांची धार्मिक विधी पार पाडू शकतात, तथापि भाविकांना/बाहेरील व्यक्तींस सदर ठिकाणी प्रवेश असणार नाही.
इ) धार्मिक स्थळाच्या ठिकाणी कार्यरत असणा-या व्यक्तींनी शासनाच्या प्रचलित नियमानुसार लवकरात लवकर लसीकरण करुन घ्यावे. जेणेकरुन सदरची धार्मिक स्थळे लवकरात लवकर उघडणे शक्य होईल.
ई) धार्मिक स्थळांच्या ठिकाणी विवाह अथवा अंतिम संस्कारांशी संबंधित कोणतेही कार्य पार पाडतांना विवाह व अंतिम संस्काराबाबत या आदेशातील परिच्छेद क्रमांक १३ मध्ये दिलेले निर्देश लागू असतील.

**८. केश कर्तनालय/स्पा/सलून/ब्युटी पार्लर (Barber Shops/Spa/Saloon/Beauty Parlors) :**

अ) केश कर्तनालय/स्पा/सलून/ब्युटी पार्लर बंद राहतील.
आ) सदर ठिकाणी कार्यरत असणा-या व्यक्तींनी शासनाच्या प्रचलित नियमानुसार लवकरात लवकर लसीकरण करुन घ्यावे. जेणेकरुन सदरची दुकाने लवकरात लवकर उघडणे शक्य होईल.

**९. शाळा व महाविद्यालये (Schools and colleges):**

अ) शाळा व महाविद्यालये बंद असतील.
आ) १० वी व १२ वी च्या विद्यार्थ्यांना परिक्षेसाठी हे निर्बंध लागू नसतील, परिक्षेच्या संबंधित सर्व कर्मचा-यांनी लसीकरण करुन घ्यावे अथवा कोव्हीड चाचणी RT-PCR/RAT/TruNAT/CBNAAT करुन कोव्हीड निगेटिव्ह असल्याचे प्रमाणपत्र सोबत बाळगावे. सदर प्रमाणपत्र ४८ तासांसाठी वैध असावे.
इ) कोणत्याही मंडळाची/विद्यापीठाची परिक्षा राज्याबाहेर होणार असेल व त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्यास संबंधित विभागाने स्थानिक आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणास विश्वासात घेवून पुढील कार्यवाही करावी.
ई) ज्या परिक्षार्थीला प्रत्यक्ष परिक्षेकरिता परिक्षेच्या ठिकाणी जावयाचे आहे, त्या परिक्षार्थी यांचेकडील हॉल तिकीट हा प्रवासाकरिता वैध आवश्यक पुरावा म्हणून मानला जाईल. प्रत्येक परिक्षार्थीला स्वत: बरोबर एक पालक / सहकारी प्रवासा दरम्यान ठेवणेबाबत देखील मुभा देण्यात येत आहे.
उ) सर्व खाजगी कोचिंग क्लासेस बंद राहतील.
ऊ) वरील सर्व आस्थापनांमध्ये काम करणा-या व्यक्तींनी शासनाच्या प्रचलित नियमाप्रमाणे लसीकरण करुन घ्यावे जेणेकरुन ते लवकरात लवकर सुरु करता येतील.

**१०. धार्मिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक कार्यक्रम (Religious, Social, Political, Cultural Functions) :**

१०.१) कोणतेही धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय कार्यक्रम करता येणार नाहीत.

१०.२) विवाहासाठी २५ पेक्षा जास्त व्यक्तींना सहभागी होता येणार नाही.

अ. लग्नाचे हॉल/लॉन्स या ठिकाणी कार्यरत असणा-या सर्व संबंधित कर्मचा-यांनी शासनाच्या नियमावलीप्रमाणे लसीकरण करुन घ्यावे, आणि कोव्हीड चाचणी RT-PCR/RAT/TruNAT/CBNAAT करुन कोव्हीड निगेटिव्ह् असल्याचे प्रमाणपत्र सोबत बाळगणे बंधनकारक असेल.

आ. कोरोना चाचणीचा निगेटीव्ह् अहवाल नसल्यास संबंधित व्यक्तीस रु १०००/- एवढा व संबंधित आस्थापनांकडून रु १००००/- एवढा दंड वसुल करण्यात येईल.

इ. वारंवार नियमांचे उल्लंघन केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित आस्थापनांचा परवाना रद्द करुन जोपर्यंत कोव्हीड आपत्ती संपुष्टात येईपर्यंत आस्थापना बंद करण्यात येईल.

ई. धार्मिक स्थळांच्या ठिकाणी विवाह संबंधित कोणतेही कार्य पार पाडतांना विवाह व अंतिम संस्काराबाबत वरील निर्देशांचे पालन करणे बंधनकारक राहील.

१०.३) अंत्यविधीसाठी २० व्यक्तींना परवानगी असेल. संबंधित कर्मचारी यांनी लवकरात लवकर लसीकरण करुन घ्यावे, आणि कोव्हीड चाचणी RT-PCR/RAT/TruNAT/CBNAAT करुन कोव्हीड निगेटिव्ह् असल्याचे प्रमाणपत्र सोबत बाळगणे बंधनकारक असेल. धार्मिक स्थळांच्या ठिकाणी अंतिम संस्कारांशी संबंधित कोणतेही कार्य पार पाडतांना अंतिम संस्काराबाबत वरील निर्देशांचे पालन करणे बंधनकारक राहील.

**११. ऑक्सीजन उत्पादक (Oxygen Producers) :**

१०.१) ज्या औद्योगिक प्रक्रियेमध्ये कच्चा माल म्हणून ऑक्सीजनचा वापर होतो अशा कंपन्या बंद राहतील. परंतू अत्यावश्यक उपक्रमातील प्रक्रियेसाठी किंवा अपवादात्मक परिस्थितीत आवश्यक कारणांची नोंद करुन् त्यांनी संबंधित प्राधिकरणाकडे (Licensing Authority) रितसर अर्ज करुन परवानगी प्राप्त करुन घ्यावी

१०.२) सर्व औद्योगिक ऑक्सीजन उत्पादकांनी उत्पादनाचा सर्व कोटा वैद्यकीय औषधोत्पदनासाठी राखीव ठेवावा. सर्व उत्पादकांनी आपल्या ग्राहकांना १० एप्रिल, २०२१ नंतर ऑक्सीजनचा वापर टाळण्यासाठी कळविण्यात यावे.

**१२. ई-कॉमर्स (E-Commerce) :**

१२.१) ई-कॉमर्स सेवा फक्त वरील नियम क्र. २ मधील अत्यावश्यक वस्तु व सेवांकरिता अनुज्ञेय असेल.

१२.२) यासंबंधात सर्व व्यक्तींनी शासनाच्या प्रचलित नियमाप्रमाणे लसीकरण करणे बंधनकारक असेल. भारत सरकारच्या सुचनांप्रमाणे ई कॉमर्स आस्थापना क्षमताधारक असेल तर त्यांनी त्यांचे आस्थापनांचे ठिकाणी लसीकरण कॅम्प आयोजित करावे. वरील क्रमांक ५ मध्ये नमुद आस्थापनांशी संबंधित सर्व व्यक्ती व होम डिलीव्हरी करणा-या सर्व व्यक्तींना कोव्हीड मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे बंधनकारक राहील.

१२.३) ज्या इमारतींमध्ये एका पेक्षा जास्त कुटुंब राहत असतील तिथे होम डिलीव्हरी करण्यासाठी सर्व निर्बंधाचे पालन करावे लागतील, अशा इमारतीत होम डिलीवरी करणा-या व्यक्तीस संचार करण्यास मनाई असेल, त्या इमारतीचे कर्मचा-यांनी होम डिलीव्हरी करावी. तसेच होम डिलीव्हरी करणा-या व्यक्ती व इमारतधारकांना कोव्हीड मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे बंधनकारक असेल.

१२.४) होम डिलिवरी करतांना कोव्हीड मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन करणा-यांना रु १,०००/- एवढा दंड आकारण्यात येईल. वारंवार निययामांचे उल्लंघन करणा-यांचा कोव्हीड आपत्ती संपुष्टात येईपर्यंत परवाना मागे घेण्यात येईल.

**१३. सहकारी गृहनिर्माण संस्था (Co-operative Housing Societies):**

१३.१) ज्या सहकारी गृहनिर्माण संस्थेत पाच किंवा त्यापेक्षा जास्त कोरोना संक्रमित सक्रिय रुग्ण आढळून येतील, त्या इमारत्ती सुक्ष्म प्रतिबंधीत क्षेत्र (Micro Containment Zone) म्हणून घोषित करणेत येतील. व त्यांना सुक्ष्म प्रतिबंधीत क्षेत्र (Micro Containment Zone) करिता ठरवून दिलेल्या सूचनांचे पालन करणे बंधनकारक असेल.

१३.२) अशा गृहनिर्माण संस्थांनी अभ्यागतांच्या माहितीसाठी इमारतीबाहेर फलक प्रदर्शित करुन अभ्यागतांना प्रवेश बंदी करावी.

१३.३) अशा सुक्ष्म प्रतिबंधीत क्षेत्रामध्ये ये-जा करणा-यांवर नियंत्रण ठेवावे.

१३.४) नियमांचे उल्लंघन केल्यास अशा गृहनिर्माण संस्थेस पहिल्यांदा रु १०,०००/- एवढा दंड आकारण्यात येईल. त्यानंतर पुनश्च: उल्लंघन होत असल्याचे निदर्शनास आल्यास रु २०,०००/- एवढा दंड आकारणी करण्यात येईल. दंडाच्या रक्कमेतून गृहनिर्माण संस्था नियमांचे पालन करते अथवा नाही याची शहानिशा करण्यासाठी मनुष्यबळाची नियुक्ती करणेत येईल.

१३.५) सर्व सहकारी गृहनिर्माण संस्थांना सुचित करणेत येते की, त्यांचे इमारतीमध्ये विविध कामानिमित्त सातत्याने येणा-या व्यक्तींचे शासनाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे लसीकरण करावे, तोपर्यंत त्यांची RT-PCR/RAT/TruNAT/CBNAAT चाचणी करण्यात यावी.

**१४. बांधकाम क्षेत्र (Construction Activity) :**

१४.१) ज्या ठिकाणी मजूरांची राहण्याची व्यवस्था आहे अशाच ठिकाणी बांधकाम करणेसाठी परवानगी असेल. बांधकाम साहित्याची वाहतूक वगळता इतर कामांसाठी बाहेरुन मजूर आणून काम करणे अनुज्ञेय नसेल.

१४.२) अशा ठिकाणी कार्यरत सर्व व्यक्तींनी शासनाच्या प्रचलित नियमाप्रमाणे लवकरात लवकर लसीकरण करणे बंधनकारक असेल.

१४.३) नियमांचे उल्लंघन केल्यास विकासकांकडून रु १०,०००/- एवढा दंड वसूल करणेत येईल तसेच वारंवार उल्लंघन होत असल्यास कोव्हीड आपत्ती संपुष्टात येईपर्यंत बांधकाम बंद करणेत येईल.

१४.४) जर एखादा कामगार कोरोना संक्रमित झाल्यास त्याला वैद्यकीय रजा मंजूर करावी. त्याला कामावरुन काढता येणार नाही. तसेच त्याला या कालावधीचे पुर्ण वेतन अनुज्ञेय राहील.

सदर आदेशाचे महापालिका प्रशासन व पोलिस यंत्रणा यांनी नियमितरितीने काटेकोरपणे पालन करावे व उल्लंघन करणा-यांविरुध्द् नियमानुसार कायदेशीर कारवाई करावी. प्रतिबंधित क्षेत्र (Containment Zone) बाबत यापूर्वी वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश व सर्व निर्बंध लागू राहतील. सहायक आयुक्त, प्रभाग समिती व पोलिस विभागाने प्रतिबंधित क्षेत्र (Containment Zone) व सुक्ष्म प्रतिबंधित क्षेत्र (Micro Containment Zone) बाबत नियमांचे काटेकोरपणे पालन होईल, याची दक्षता घ्यावी.

सदर आदेश दिनांक १४/०४/२०२१ रोजी रात्री ०८.०० वाजेपासून दिनांक ०१/०५/२०२१ रोजी सकाळी ०७.०० वाजेपर्यंत लागू असतील हा आदेश उल्हासनगर महानगरपालिकेने Break the Chain-01 अंतर्गत जारी केलेल्या आदेशाचा पुरवणी आदेश म्हणून जाहिर करण्यात येत आहे. व दरम्यानच्या कालावधीत शासनाकडून अन्य कोणत्याही सूचना/आदेश प्राप्त झाल्यास त्यांचे अनुपालन करणे देखील बंधनकारक असेल.

उक्त आदेशाची सर्व संबंधितांनी तात्काळ अंमलबजावणी करावी. सदरहू आदेशाची अंमलबजावणी करण्यास कोणत्याही व्यक्तीने टाळाटाळ केल्यास, विरोध दर्शविल्यास, संबंधितांचे विरुध्द आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ मधील कलम ५१ ते ६०, साथरोग नियंत्रण अधिनियम, १८९७ व भारतीय दंड संहिता, १८६० कलम, १८८ मधील तरतुदीनुसार दंडनीय व कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

(डॉ. युवराज भदाणे)
**माहिती व जनसंपर्क अधिकारी**
**उल्हासनगर महानगरपालिका**